## निशाणी क्रमांक ४२ वरील आदेश.

आरोपीने प्रस्तुतचा अर्ज त्याचा बचाव सिध्द करण्यासाठी तक्रारदार संस्थेच्या संचालक विलास नाईक, किशोर भुसारी आणि कार्यकारी अधिकारी प्रशांत गंभीर यांची साक्ष नोंदवण्यासाठी दिला आहे. आरोपीच्या कथनाप्रमाणे, त्याला त्याचे निर्दोषत्व सिध्द करण्यासाठी सदर साक्षीदारांचा पुरावा सादर करायचा असून त्यांनी त्याच्या विरोधात खोटा ठराव पारीत केलेला आहे. सबब, त्याने त्याचा अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

२. तक्रारदार संस्थेच्या वकिलांनी अर्जाच्या पाठीमागे म्हणणे देऊन आरोपीने केवळ विलंब करण्यासाठी अर्ज दाखल केल्याचे कथन केले आहे. त्यांनी आरोपीने पुर्वी सदर साक्षीदारांना बोलावण्यासाठी दिलेला अर्ज गुणदोषावरती अंशतः मंजूर झाल्यानंतर स्वतःचा पुरावा देण्यासाठी मुदत मागून खोटा अर्ज दाखल केलेला असल्यामुळे नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

३. आरोपीला विधी सेवा मार्फत नेमून दिलेल्या वकिलांनी नि. क्र.४१ प्रमाणे अर्ज देऊन त्यांचे वकीलपत्र काढून घेतलेले आहे. तसेच आरोपीने देखील नि. क्र.४० च्या अर्जाने त्याच्या वकिलांची नियुक्ती रद्द करण्याची मागणी केलेली आहे. आरोपीचा व विधी सेवा मार्फत देण्यात आलेल्या वकिलांचा अर्ज मंजूर करण्यात आलेला आहे. सबब, आरोपी हा स्वतः सदर प्रकरण पुढे चालवत असून त्याने अर्जातील कथना प्रमाणे युक्तिवाद केला आहे. तक्रारदार संस्थेच्या वकिलांनी आरोपीचा सदर साक्षीदारांना बोलावण्याचा पुर्वीचा अर्ज अंशतः मंजूर झालेला असून त्याने केवळ विलंबासाठी प्रस्तूत अर्ज दिलेला असल्यामुळे तो रद्द करण्याची विनंती केली आहे.

४. अभिलेखाचे अवलोकन केले असता, आरोपीचा नि. क्र.२६ वरील अर्ज पुरेशा कागदोपत्री पुराव्या अभावी रद्द करण्यात आल्यानंतर त्याने दि.०१.०२.२०२२ आणि ०१.०३.२०२२ रोजीच्या पत्राच्या प्रती दाखल केल्यामुळे त्याचा नि. क्र.२७ वरील अर्ज अंशतः मंजूर करण्यात येऊन तक्रारदार संस्थेचे निपाणी शाखाधिकारी आणि

वसूली कायदा विभाग मुख्याधिकारी यांना साक्षीसमन्स काढण्यात आले होते. त्यांचा अनुक्रमे नि. क्र.३४ व ३६ प्रमाणे पुरावा नोंदवण्यात आलेला आहे. त्यांच्या पुराव्यातून आरोपीने दि.०१.०२.२०२२ रोजी पैसे भरु शकत नसल्यामुळे हप्ते पध्दत करुन देण्यासाठी पत्र दिल्याचे मान्य केले आहे. तसेच साक्षीदार सतीशकुमार याने आरोपीने त्याच्या अपघातापुर्वी पर्यंत कर्जाचे हप्ते भरल्याचे कथन केले आहे. त्यांच्या उलट तपासातून, आरोपीचे कर्जाचे तीन हप्ते थकल्यानंतर ते अकार्यक्षम यादीत गेल्यामुळे मुख्य शाखेकडे पाठवल्याची बाब पटलावरती आलेली आहे.

**५.** आरोपीने सदर अर्जामधून तक्रारदार संस्थेच्या संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष नोंदवण्यासाठी दि.०१.०२.२०२२ रोजीच्या प्राधिकृत अधिकारी आजरा अर्बन बँक आजरा यांना दिलेल्या पत्राचा संदर्भ दिलेला आहे. सबब, आरोपीला त्याचा बचाव मांडण्याची संधी देण्यासाठी न्यायाच्या दृष्टीने प्रस्तूत अर्ज मंजूर करणे न्यायोचित ठरत आहे. आरोपीचा अर्ज मंजूर केल्यामुळे तक्रारदार संस्थेचे कोणतेही नुकसान होणार नाही. आरोपी हा साक्षीदारांच्या उपस्थितीचा भत्ता भरण्यास तयार आहे. सदर प्रकरण हे कालबध्द करण्यात आलेले असल्यामुळे न्यायाच्या दृष्टीने हे न्यायालय खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे,

## <u>आदेश</u>

**१**. अर्ज खालील प्रमाणे अंशतः मंजुर करण्यात येतो.

**२**. आरोपीच्या मागणी प्रमाणे तक्रारदार संस्थेचे संचालक विलास नाईक, किशोर भुसारी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी प्रशांत गंभीर यांना साक्षीसमन्स काढण्यात यावे.

**३.** आरोपीने आवश्यक असणारे साक्षीशुल्क न्यायालयात जमा करावे अथवा साक्षीदारास हजर झाल्यानंतर प्रत्यक्ष द्यावे.

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

**(आर. पी. थोरे)**

न्या. अ. सां. क्र.–एम.एच.०२८९७

दिनांक – २९.०४.२०२६.

दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, आजरा.